सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२५/1700
दिनांक 18 JUN 2025

प्रति,

**प्राचार्य,**
तांत्रिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती

**विषय : महाडीबीटी पोर्टलवर, योजनांचे अर्ज भरताना Right to Give Up हा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पुर्नस्थापित ( Reinstate) करण्याचा पर्याय प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्याबाबत...**

**संदर्भ :** १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/३४१ दिनांक १७/०६/२०२५
२.महाआयटी यांचेकडून दि.१०/०६/२०२५ रोजी प्राप्त झालेला ईमेल संदेश

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, महाआयटी यांचेकडून संदर्भिय संदेशाव्दारे, महाडीबीटी पोर्टलवरील योजनांचे अर्ज भरताना Right to Give Up हा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पुर्नस्थापित (Reinstate) करण्याचा पर्याय डीबीटी पोर्टलवर संबंधित **संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये** उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरचा पर्याय **दि.९ जून २०२५ ते दि ३० जून २०२५ या कालावधीमध्ये कार्यान्वित (Activate)** असेल असे कळविण्यात आलेले आहे.

तरी, **सर्व संस्थाच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की**, योजनांचे अर्ज भरताना **Right to Give Up हा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांचे Right to Give Up हा Cancel करण्याच्या पर्याय संबंधित संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये** उपलब्ध करुन देण्यात आला असून, **संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही त्वरित करण्यात यावी.**

१. ज्या विद्यार्थ्यांनी शै.वर्ष२०२३-२४/२०२४-२५ मध्ये Right to Give Up या पर्यायाची निवड केली अशा विद्यार्थ्यांच्या संबंधित संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये विद्यार्थ्याने केलेली Right to Give Up ची निवड Cancel करण्याचा पर्याय देण्यात आलेला आहे.

२. संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी, शैक्षणिक वर्ष २०२३-२४/२०२४-२५ मध्ये Right to Give Up हा पर्याय निवडलेल्या सर्व विद्यार्थ्यांना संपर्क करुन त्यांच्याकडून **Right to Give Up हा Cancel करायचे आहे किंवा कसे? याबाबत विचारणा करण्यात यावी** व ज्या विद्यार्थ्यांना योजनेच्या लाभासाठी परत अर्ज भरण्यासाठी Right to Give Up हा Cancel करायचा आहे त्यांच्याकडून तसा लेखी अर्ज घेऊन त्या विद्यार्थ्याचा निवड केलेला Right to Give Up हा Cancel करण्यात यावा. जेणेकरुन संबंधित विद्यार्थी पुन:च्छ योजनेच्या लाभासाठीचा अर्ज भरु शकणार.

३. सदर अर्ज **Cancel** करण्याचा पर्याय हा फक्त **दि.३० जून २०२५ पर्यंत कार्यान्वित (Activate)** राहणार आहे याची सर्व संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

४. दि.३० जून २०२५ नंतर सदरचा पर्याय उपलब्ध राहाणार नाही, या कारणास्तव कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभासाठी अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी स्वत: घ्यावी. तद्नंतर याबाबतचा कोणत्याही तक्रारीची दखल संचालनालयाकडून घेतली जाणार नाही याची सर्व संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

**( मनोज म.अंधारे )**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:** १. **मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. **प्रोग्रामर**, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी